सत्यमेव जयते

रेलवे भर्ती बोर्ड | RAILWAY RECRUITMENT BOARD

सीईएन ०१/२०२६ सहायक लोको पायलट (एएलपी) के पद पर भर्ती

CEN 01/2026 Recruitment of Assistant Loco Pilot (ALP)

Test Date	05/11/2026
Test Time	4:00 PM - 5:00 PM
Subject	RRB ALP 2026 CBT 1

*** Note**
Correct Answer will carry 1 mark per Question.
Incorrect Answer will carry 1/3 Negative mark per Question.

1. Options shown in green color with a tick icon are correct.
2. Chosen option on the right of the question indicates the option selected by the candidate.

Section : **RRB ALP**

Q.1 एका ड्रेसची छापील किंमत ₹1,200 आहे. जर त्याची विक्री किंमत ₹960 असेल, तर सवलत किती टक्के असेल?

Ans
✗ A. 25%
✓ B. 20%
✗ C. 15%
✗ D. 30%

Q.2 कर्जदाराने प्रत्येकी ₹35,280 च्या दोन समान वार्षिक हप्त्यांद्वारे कर्जाची परतफेड केली आणि पहिला हप्ता पहिल्या वर्षाच्या शेवटी भरावा लागला. जर चक्रवाढ व्याज वार्षिक आकारणीनुसार 5% दराने असेल, तर एकूण किती व्याज दिले गेले (₹ मध्ये)?

Ans
✗ A. 5,280
✗ B. 4,800
✗ C. 4,640
✓ D. 4,960

Q.3 पाण्याच्या ग्लासात पेन्सिल अर्धवट बुडवल्यावर ती वाकलेली दिसते. कोणती घटना या निरीक्षणाचे सर्वात चांगल्या प्रकारे स्पष्टीकरण देते आणि ती कुठे घडून येते?

Ans
✓ A. पाणी आणि हवा यांच्या आंतरपृष्ठावर होणारे अपवर्तन
✗ B. पाण्याच्या रेणूंमुळे होणारे प्रकाशाचे विकिरण
✗ C. पाण्याच्या पृष्ठभागावरून होणारे परावर्तन
✗ D. पाण्यातील प्रकाशाचे अपस्करण

Q.4 जर 'A' म्हणजे '÷'असेल, 'B' म्हणजे '×'असेल, 'C' म्हणजे '+'असेल आणि 'D' म्हणजे '−'असेल तर दिलेल्या समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय उत्तर येईल?

107 D 132 A 4 B 3 C 11 = ?

Ans
✗ A. 14
✓ B. 19
✗ C. 15
✗ D. 16

Q.5 इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर-समूह जोड्यांमध्ये एका विशिष्ट प्रकारे साधर्म्य आहे आणि म्हणून त्या एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी निवडा.
(टीप: गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी ही त्याच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील तिच्या स्थानावर आधारित नसावी.)

Ans
- ✗ A. NK–IF
- ✓ B. VS–PP
- ✗ C. LI–GD
- ✗ D. BY–WT

Q.6 जर

$$4(\sec^2 59^\circ - \cot^2 31^\circ) + \frac{6\sqrt{2}}{7}\cos 45^\circ - 2\alpha \tan^2 56^\circ \times \tan^2 34^\circ = 2\alpha,$$

आहे, तर α चे मूल्य किती?

Ans
- ✓ A. $1\frac{3}{14}$
- ✗ B. $2\frac{5}{14}$
- ✗ C. $1\frac{5}{14}$
- ✗ D. $2\frac{3}{14}$

Q.7 अशा एका शहराची कल्पना करा जेथे धूररहित तंबाखूचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. तेथे सार्वजनिक आरोग्याची कोणती समस्या सर्वाधिक आढळण्याची शक्यता आहे?

Ans
- ✗ A. त्वचेच्या ॲलर्जीमध्ये वाढ
- ✗ B. हाडांच्या फ्रॅक्चरमध्ये वाढ
- ✗ C. विषाणूजन्य संसर्गांमध्ये घट
- ✓ D. तोंडाच्या कर्करोगाचे उच्च प्रमाण

Q.8 खालीलपैकी कोणती परिस्थिती बलाने केलेल्या कार्याची वैज्ञानिक व्याख्या सर्वोत्तमरीत्या स्पष्ट करते?

Ans
- ✗ A. एखाद्या स्थिर भिंतीला पूर्ण ताकदीनिशी ढकलणे
- ✗ B. सपाट जमिनीवरून स्थिर वेगाने पिशवी वाहून नेणे
- ✗ C. पुस्तक न सरकवता हळुवारपणे टेबलावर ठेवणे
- ✓ D. एक व्यक्ती गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध एक खोका उभ्या दिशेने वर उचलते

Q.9 एका व्यक्तीने ₹56,000 एवढी रक्कम वार्षिक 12% सरळ व्याजदराने, 3 वर्षांसाठी गुंतवली. तर, 3 वर्षांनंतर त्याला मिळणारी एकूण रक्कम (₹ मध्ये) किती असेल?

Ans
- ✗ A. 78,160
- ✗ B. 77,160
- ✗ C. 75,160
- ✓ D. 76,160

Q.10 जर $\tan(9x-15)^\circ = \cot(8x+20)^\circ$ असेल तर x ची किंमत काढा.

Ans
- ✓ A. 5
- ✗ B. 4
- ✗ C. 8
- ✗ D. 10

Q.11 एका ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्मने प्रवेश मोहिमेदरम्यान त्याच्या वार्षिक वर्गणी शुल्कात 25 % ने कपात केली आणि नंतर सवलतीच्या वर्गणी शुल्कात 20 % ने वाढ केली. जर मूळ वर्गणी शुल्क ₹8,000 असेल, तर अंतिम वर्गणी शुल्क (₹ मध्ये) किती असेल?

Ans
- ✗ A. 7,600
- ✓ B. 7,200
- ✗ C. 7,000
- ✗ D. 7,400

Black Book

Q.12 खालीलपैकी कोणत्या संख्येला 46 आणि 41 या दोन्हीने (नि:शेष) भाग जाईल?

Ans
- ✔ A. 62238
- ✘ B. 60607
- ✘ C. 63842
- ✘ D. 62810

Q.13 एका कारच्या रेडिएटरमध्ये 63% अँटीफ्रीझ द्रावण असणे आवश्यक आहे. एका वाहनचालकाकडे 23% चे 4 लिटर अँटीफ्रीझ द्रावण आहे. तर 63% अँटीफ्रीझ द्रावण तयार करण्यासाठी, त्याने आपल्या द्रावणात 99% अँटीफ्रीझ असलेले किती लीटर (2 दशांश स्थानांपर्यंत पूर्णांकित केलेले) द्रावण मिसळले पाहिजे?

Ans
- ✔ A. 4.44
- ✘ B. 6.05
- ✘ C. 10.25
- ✘ D. 7.21

Q.14 दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

36,44,60,84,116, ?

Ans
- ✘ A. 158
- ✘ B. 155
- ✘ C. 157
- ✔ D. 156

Q.15 खालील मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या.
(डावी बाजू)
L U F I T U A E B A D A Y J H F A K A N F G D (उजवी बाजू)
मालिकेच्या उजव्या बाजूकडून दुसऱ्या आणि डाव्या बाजूकडून तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या अक्षरांच्या दरम्यान इंग्रजी वर्णक्रमानुसार किती अक्षरे असतील?

Ans
- ✘ A. three
- ✘ B. two
- ✘ C. one
- ✔ D. none

Q.16 X, Y, Z, A आणि B या व्यक्तींची वये भिन्न आहेत. केवळ एकच व्यक्ती X पेक्षा लहान आहे. A हा B पेक्षा मोठा आहे आणि B हा Z पेक्षा मोठा आहे. Z हा X पेक्षा मोठा आहे. तर सर्वात मोठे कोण असेल?

Ans
- ✘ A. Y
- ✘ B. X
- ✘ C. Z
- ✔ D. A

Q.17 या प्रश्नात, (I) आणि (II) क्रमांकित अशी दोन विधाने दिली आहेत. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधानांत दिलेली माहिती पुरेशी आहे की नाही हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर निवडा.

प्रश्न: Q, L, M, R आणि E या 5 काठ्या प्रत्येकी वेगवेगळ्या उंचीच्या असून, त्यांपैकी सर्वात उंच काठी कोणती आहे?

विधाने:
(I) M ही केवळ एकाच काठीपेक्षा उंच आहे. R ही L पेक्षा लहान आहे, पण Q पेक्षा उंच आहे.
(II) R ही E पेक्षा उंच आहे.

Ans
- ✘ A. केवळ विधान I मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर केवळ विधान II मधील माहिती पुरेशी नाही.
- ✘ B. केवळ विधान II मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर केवळ विधान I मधील माहिती पुरेशी नाही.
- ✔ C. विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे (आणि केवळ विधान I किंवा केवळ विधान II नाही) प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे.
- ✘ D. विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी नाही.

Q.18 एक पाईप 12 मिनिटांत टाकी भरू शकतो तर दुसरा पाईप 14 मिनिटांत पूर्णपणे भरलेली टाकी रिकामी करू शकतो. जर दोन्ही पाईप रिकाम्या टाकीत एकत्र चालू केले तर टाकीचा दोन तृतीयांश भाग भरायला किती वेळ (मिनिटात) लागेल ?

Ans
- ✗ A. 168
- ✗ B. 224
- ✗ C. 112
- ✓ D. 56

Q.19 खाली संख्यांचे दोन संच दिले आहेत. संख्यांच्या प्रत्येक संचामध्ये, पहिल्या संख्येवर विशिष्ट गणितीय क्रिया करून दुसरी संख्या मिळवली आहे. त्याचप्रमाणे, दुसऱ्या संख्येवर विशिष्ट गणितीय क्रिया करून तिसरी संख्या मिळवली आहे आणि अशाच प्रकारे पुढे चालू राहते. दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय दिलेल्या संचामध्ये केलेल्या गणितीय क्रियांच्या संचांचे अनुसरण करतो?
(सूचना - गणितीय क्रियांसाठी दोन/तीन अंकी संख्या एकल अंकांमध्ये विभागणे अभिप्रेत नाही. उदा. जर 37 नंतर 10 असेल तर 3 +7 अशी गणितीय क्रिया होऊ शकत नाही. कारण दोन अंकी संख्या एकल अंकांमध्ये विभागणे अभिप्रेत नाही.)
27 - 31 - 248 - 237
11 - 15 - 120 - 109

Ans
- ✗ A. 1 - 4 - 28 - 17
- ✗ B. 3 - 8 - 64 - 54
- ✓ C. 26 - 30 - 240 - 229
- ✗ D. 3 - 7 - 70 - 60

Q.20 E, F, G, H, W, X आणि Y हे सात मित्र उत्तरेकडे तोंड करून एका सरळ रेषेत बसले आहेत. Y आणि W यांच्यादरम्यान केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. फक्त E हा X च्या उजवीकडे बसला आहे. W आणि E यांच्यादरम्यान केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. H हा F च्या उजवीकडे एखाद्या ठिकाणी आणि G च्या डावीकडे एखाद्या ठिकाणी बसला आहे. तर रांगेच्या उजव्या टोकापासून तिसऱ्या स्थानावर कोण बसला आहे?

Ans
- ✓ A. G
- ✗ B. X
- ✗ C. F
- ✗ D. W

Q.21 दोन संख्यांचा म.सा.वि. (HCF) 18 आहे आणि त्यांचा ल.सा.वि. (LCM) 360 आहे. जर त्यांपैकी एक संख्या 90 असेल, तर दुसरी संख्या काढा.

Ans
- ✗ A. 180
- ✗ B. 120
- ✗ C. 90
- ✓ D. 72

Q.22 T आणि U या दोन ट्रेन समांतर मार्गावर एकमेकांकडे जात आहेत. ट्रेन T ची लांबी 210 m आहे आणि ती 40 km/hr वेगाने जात आहे, तर ट्रेन U ची लांबी 240 m आहे आणि ती 50 km/hr वेगाने जात आहे. तर त्या दोन ट्रेन एकमेकींना भेटल्यापासून एकमेकींना ओलांडण्यासाठी किती वेळ (सेकंदांत) घेतील?

Ans
- ✓ A. 18 सेकंद
- ✗ B. 21 सेकंद
- ✗ C. 21.6 सेकंद
- ✗ D. 24 सेकंद

Q.23 खालील मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या.
(डावी बाजू)
E I I N T I K E M R A H G D A H B G K I D F H (उजवी बाजू)
मालिकेच्या उजव्या बाजूकडून सातव्या आणि डाव्या बाजूकडून दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या अक्षरांच्या दरम्यान इंग्रजी वर्णक्रमानुसार किती अक्षरे असतील?

Ans
- ✗ A. सात
- ✗ B. आठ
- ✗ C. पाच
- ✓ D. सहा

black

Q.24 दिलेली मालिका तार्किकदृष्ट्या पूर्ण होण्यासाठी प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता अक्षर-संख्या समूह येईल?

GUL 2 JSJ -4 MQH 8 ? SMD 32

Ans
- ✗ A. KOI -21
- ✗ B. HJI -43
- ✗ C. KYT -11
- ✓ D. POF -16

Q.25 एक फूड डिलिव्हरी कंपनी सात दिवसांत पूर्ण झालेल्या डिलिव्हरींची संख्या 48, 50, 48, 46, x, 50 आणि 48 अशी नोंदवते, जेथे x हा धनात्मक पूर्णांक आहे. जर 48 हा एकमेव बहुलक असेल, तर x ची सर्वात लहान संभाव्य किंमत काढा.

Ans
- ✓ A. 1
- ✗ B. 46
- ✗ C. 48
- ✗ D. 50

Q.26 260 km प्रवास करण्यासाठी एक डिलिव्हरी व्हॅन 20 लिटर डिझेल वापरते. तर त्या व्हॅनचे सरासरी मायलेज (km प्रति लिटर) किती असेल?

Ans
- ✓ A. 13
- ✗ B. 14
- ✗ C. 12
- ✗ D. 10

Q.27 इंग्रजी वर्णक्रमानुसार, TXBZ हे AEIG शी एका विशिष्ट प्रकारे संबंधित आहे. त्याचप्रकारे, DHLJ हे KOSQ शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार खालीलपैकी कशाशी RVZX संबंधित असेल?

Ans
- ✗ A. YCFE
- ✓ B. YCGE
- ✗ C. YBFE
- ✗ D. YDFN

Q.28 43A762B या 7 अंकी संख्येला 12 ने (निःशेष) भाग जातो. तर, (A + B) चे किमान मूल्य किती असेल?

Ans
- ✓ A. 2
- ✗ B. 1
- ✗ C. 4
- ✗ D. 3

Q.29 HUSBAND या शब्दातील प्रत्येक अक्षराची इंग्रजी वर्णक्रमानुसार मांडणी केल्यास किती अक्षरांचे स्थान(ने) बदलणार नाही?

Ans
- ✗ A. 3
- ✓ B. 0
- ✗ C. 2
- ✗ D. 1

Q.30 विक्रांत पॉइंट A पासून सुरुवात करतो आणि उत्तरेकडे 55 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळतो, 60 km गाडी चालवतो, नंतर उजवीकडे वळतो आणि 70 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळतो आणि 71 km गाडी चालवतो. तो शेवटचा उजवीकडे वळतो, 15 km गाडी चालवतो आणि पॉइंट P वर थांबतो. पॉइंट A वर पुन्हा पोहोचण्यासाठी त्याने किती अंतर (सर्वात कमी अंतर) आणि कोणत्या दिशेने गाडी चालवावी? (निर्दिष्ट केल्याशिवाय, सर्व वळणे फक्त 90 अंश वळणे आहेत.)

Ans
- ✗ A. पश्चिमेकडे 13 km
- ✗ B. पूर्वेकडे 10 km
- ✗ C. पश्चिमेकडे 12 km
- ✓ D. पूर्वेकडे 11 km

black book

Q.31 खालीलपैकी असे अधातू ऑक्साईड ओळखा, जे पाण्यात विरघळले असता आम्ल तयार करत नाही.

Ans
- ✗ A. SO_2
- ✗ B. NO_2
- ✓ C. NO
- ✗ D. CO_2

Q.32 10 m खोल आणि 36 m रुंद असलेली एक नदी 2.7 km/hr वेगाने वाहत आहे. प्रति मिनिट समुद्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण (m^3 मध्ये) किती असेल?

Ans
- ✗ A. 10,260
- ✗ B. 12,600
- ✓ C. 16,200
- ✗ D. 12,000

Q.33 झोया A स्थानापासून गाडी चालवण्यास सुरुवात करते आणि पूर्वेकडे 24 km गाडी चालवते. त्यानंतर ती उजवीकडे वळते आणि 20 km गाडी चालवते. त्यानंतर ती पुन्हा उजवीकडे वळते आणि 22 km गाडी चालवते, नंतर पुन्हा उजवीकडे वळते आणि 31 km गाडी चालवते. शेवटी ती डावीकडे वळते आणि 2 km गाडी चालवून B स्थानावर थांबते. तर A स्थानावर पुन्हा पोहोचण्यासाठी तिने किती अंतर (सर्वात कमी अंतर) आणि कोणत्या दिशेने गाडी चालवली पाहिजे? (नमूद केल्याशिवाय सर्व वळणे केवळ 90-अंशाची आहेत.)

Ans
- ✗ A. 7 km दक्षिणेकडे
- ✗ B. 8 km पश्चिमेकडे
- ✗ C. 9 km उत्तरेकडे
- ✓ D. 11 km दक्षिणेकडे

Q.34 एका वन्यजीव सर्वेक्षणानुसार, 10% वार्षिक वाढीनंतर एका राखीव प्रदेशातील हरणांची संख्या 13,200 झाली. एक वर्षापूर्वी हरणांची संख्या किती होती?

Ans
- ✗ A. 12120
- ✗ B. 14520
- ✓ C. 12000
- ✗ D. 11880

Q.35 C, D, E, F, X, Y आणि Z ही सात खोकी एकावर एक ठेवली आहेत, पण ती याच क्रमाने ठेवली असतीलच असे नाही. केवळ C हे खोके Y च्या वर ठेवले आहे. Y आणि X यांच्या दरम्यान केवळ E हे खोके ठेवले आहे. D च्या खाली केवळ Z हे खोके ठेवले आहे.
F आणि Z यांच्या दरम्यान किती खोकी ठेवली आहेत?

Ans
- ✓ A. एक
- ✗ B. तीन
- ✗ C. चार
- ✗ D. दोन

Q.36 या प्रश्नात, संख्या/चिन्हांचा समूह खाली दिलेल्या संकेत आणि पुढील अटींनुसार अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केला आहे. अटींना तर्कसंगत असलेल्या संकेतांचे योग्य संयोजन हे तुमचे उत्तर आहे. जर कोणत्याही अटींचे पालन न झाल्यास, संबंधित संख्या/चिन्हासाठीचे संकेत सारणीमध्ये दिल्याप्रमाणे तर्कसंगत असावेत.

संख्या/चिन्ह 4 5 ? ! 9 7 $ # 6 +

संकेत B O Q P S X M F W V

अटी–

(i) जर पहिला घटक चिन्ह असेल आणि शेवटचा घटक संख्या असेल, तर त्यांच्या संकेतांची परस्पर अदलाबदल करा.

(ii) जर दुसरा घटक आणि तिसरा घटक विषम संख्या असेल, तर तिसऱ्या घटकासाठी दुसऱ्या घटकाच्या संकेताचा वापर करा.

(iii) जर चौथा घटक चिन्ह असेल आणि पाचवा घटक संख्या असेल, तर त्या दोघांसाठी © ह्या संकेताचा वापर करा.

खालील गटासाठी कोणता संकेत असेल?

4 5 ? ! 9

Ans

✗ A. FOQPS

✗ B. BOWPS

✗ C. BOQPM

✓ D. BOQ©©

Q.37 हा प्रश्न खाली दिलेल्या पाच तीन-अंकी संख्यांवर आधारित आहे.

(डावीबाजू) 682 315 947 524 761 (उजवीबाजू)

(उदाहरण- 697 – पहिला अंक = 6, दुसरा अंक = 9 आणि तिसरा अंक = 7)

टीप - सर्व क्रिया डावीकडून उजवीकडे कराव्यात.

सर्वात मोठ्या संख्येच्या दुसऱ्या अंकात सर्वात लहान संख्येचा पहिला अंक मिळवल्यास मिळणारे उत्तर किती असेल?

Ans

✗ A. 8

✗ B. 9

✗ C. 10

✓ D. 7

Q.38 जॅक, कनिका, मेहुल, निधी, सिया, टीना आणि योगेश या 7 व्यक्ती एका वर्तुळाकार टेबलाभोवती टेबलाच्या केंद्राकडे तोंड करून बसल्या आहेत. योगेश हा कनिका आणि मेहुल या दोघांचाही लगतचा शेजारी आहे आणि निधीच्या डावीकडे दुसऱ्या स्थानावर बसला आहे. कनिका ही जॅकच्या उजवीकडे दुसऱ्या स्थानावर बसली आहे. टीना ही निधीची लगतची शेजारी नाही. तर योगेशच्या डावीकडून मोजल्यास योगेश आणि जॅक यांच्यामध्ये किती व्यक्ती बसल्या आहेत?

Ans

✗ A. तीन

✗ B. एक

✗ C. एकही नाही

✓ D. दोन

Q.39 एका दुकानदाराने ₹60,000 ना सहा एकसारखे मोबाईल फोन खरेदी घेतले. त्याने त्यांपैकी दोन ₹57,000 ना विकले. विकलेल्या दोन मोबाईल फोनवर त्याला किती टक्के नफा झाला?

Ans

✗ A. 187%

✗ B. 182%

✗ C. 184%

✓ D. 185%

Q.40 या प्रश्नात, संख्या/चिन्हांचा गट खाली दिलेल्या तक्त्यातील संकेत आणि पुढील अटींनुसार अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केला आहे. अटींचे पालन करून संकेतांचे योग्य संयोजन हे तुमचे उत्तर असेल. जर कोणत्याही अटीचे पालन होत नसेल, तर संबंधित संख्या/चिन्हांसाठीचे संकेत सारणीमध्ये (तक्त्यात) दिल्याप्रमाणे थेट वापरावेत.

संख्या/चिन्ह 1 # 6 @ 3 % 8 & 5 $ 2 + 94

संकेत HMBT KP AF URDWLQ

अटी-

(i) जर पहिला घटक चिन्ह असेल आणि शेवटचा घटक संख्या असेल, तर पहिल्या आणि शेवटच्या घटकांच्या संकेतांची परस्पर अदलाबदल करावी.

(ii) जर दुसरा आणि तिसरा घटक विषम संख्या असतील, तर तिसरा घटक हा दुसऱ्या घटकाच्या संकेतानुसार संकेतबद्ध केला जावा.

(iii) जर चौथा घटक चिन्ह असेल, तर चौथा घटक © म्हणून संकेतित केला जावा.

खालील संख्या आणि चिन्हांच्या गटासाठी कोणता संकेत असेल?

85326

Ans

✗ A. AUKDB

✗ B. A©KDA

✓ C. A©KDB

✗ D. A©QDB

Q.41 खाली संख्यांचे दोन संच दिले आहेत. प्रत्येक संख्या संचात, पहिल्या संख्येवर विशिष्ट गणितीय क्रिया करून परिणामी दुसरी संख्या तयार होते. त्याचप्रमाणे, दुसऱ्या संख्येवर विशिष्ट गणितीय क्रिया करून परिणामी तिसरी संख्या तयार होते आणि अशाचप्रकारे, पुढे देखील चालू राहते. दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय दिलेल्या संचांप्रमाणे समान गणितीय क्रियांच्या संचाचे अनुसरण करतो?

(टीप: संख्यांना त्यांच्या घटक अंकांमध्ये विभाजित न करता, पूर्ण संख्यांवर क्रिया कराव्यात. उदा.13 – 13 या संख्येवर केलेली क्रिया जसे की, 13 ची बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया केली जाऊ शकते. 13 चे 1 आणि 3 मध्ये विभाजन करणे आणि नंतर 1 आणि 3 वर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

6 - 36 - 46 - 56

8 - 64 - 74 - 84

Ans

✓ A. 9 - 81 - 91 - 101

✗ B. 15 - 225 - 235 - 255

✗ C. 10 - 100 - 120 - 130

✗ D. 11 - 131 - 141 - 151

Q.42 **A, B, C, D, E, F आणि G हे सात जण एका रांगेत उत्तरेकडे तोंड करून बसले आहेत. C हा रांगेच्या उजव्या टोकाकडून दुसऱ्या स्थानावर बसला आहे. B च्या डावीकडे केवळ तीन जण बसले आहेत. D हा A आणि E यांचा लगतचा शेजारी आहे. F हा E च्या उजवीकडे दुसऱ्या स्थानावर बसला आहे. तर G आणि D यांच्या दरम्यान किती जण बसले आहेत?**

Ans

✗ A. तीन

✓ B. चार

✗ C. एक

✗ D. दोन

Q.43 **पाण्याचे विद्युत अपघटन ही अपघटन अभिक्रिया म्हणून का वर्गीकृत केली जाते?**

Ans

✗ A. वीज पाणी तापवते

✗ B. ऑक्सिजन विद्युत अग्रांसोबत संयोग पावतो

✗ C. हायड्रोजन ऑक्सिजनची जागा घेतो

✓ D. पाण्याचे हायड्रोजन आणि ऑक्सिजनमध्ये विघटन होते

Q.44 पुढील शब्दांवर आधारित हा प्रश्न आहे.

ACT LAG GEL IDS

प्रत्येक शब्दामध्ये, प्रत्येक स्वर हा इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत नंतर येणाऱ्या अक्षराने बदलला जातो आणि प्रत्येक व्यंजन हे इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत आधी येणाऱ्या अक्षराने बदलले जाते. तर अशा प्रकारे तयार झालेल्या किती अक्षर-समूहांमध्ये एकही स्वर असणार नाही?

Ans
- ✗ A. एक
- ✗ B. दोन
- ✓ C. चार
- ✗ D. तीन

Q.45 ABCD या चौकोनात $\angle A$ चे माप $\angle C$ पेक्षा 19° ने जास्त आहे, $\angle B$ चे $\angle C$ पेक्षा 24° ने कमी आहे आणि $\angle D$ हा $\angle B$ च्या दुपटीपेक्षा 8° ने मोठा असेल. तर $\angle A + \angle D - \angle C$ चे मूल्य काढा.

Ans
- ✗ A. 129°
- ✓ B. 141°
- ✗ C. 137°
- ✗ D. 108°

Q.46 खाली दिलेल्या दोन जोड्यांच्या रचनेप्रमाणेच रचना असलेली जोडी निवडा. दोन्ही जोड्यांची रचना समान आहे.

VZY–XBA
CGF–EIH

Ans
- ✗ A. BFE–CHF
- ✗ B. BEC–CGF
- ✗ C. BEC–DHG
- ✓ D. BFE–DHG

Q.47 दिलेल्या मालिकेत '?' च्या जागी काय येईल?
42 60 76 90 102 112 ?

Ans
- ✗ A. 121
- ✗ B. 122
- ✓ C. 120
- ✗ D. 118

Q.48 FROCKED या शब्दातील प्रत्येक अक्षर इंग्रजी वर्णक्रमानुसार मांडली जातात आणि त्यानंतर अशा प्रकारे तयार झालेल्या नवीन अक्षर-समूहामध्ये डावीकडून तिसऱ्या स्थानावर असलेले अक्षर आणि उजवीकडून दुसऱ्या स्थानावर असलेले अक्षर यांच्या दरम्यान इंग्रजी वर्णक्रमानुसार किती अक्षरे येतात?

Ans
- ✗ A. 8
- ✗ B. 12
- ✓ C. 9
- ✗ D. 10

Q.49 एका इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीने ₹12,000 ची तिकिटे खरेदी केली आणि ती बुकिंग पार्टनरला 15 % नफ्याने विकली. त्यानंतर बुकिंग पार्टनरने खरेदी किंमतीवर 10 % नफ्याने तिकिटे विकली. तर अंतिम विक्री किंमत (₹ मध्ये) किती होती?

Ans
- ✗ A. 15,400
- ✗ B. 13,800
- ✓ C. 15,180
- ✗ D. 14,580

blackbook

Q.50 5 kg वस्तुमानाचा एक खोका 20 N च्या स्थिर बलाने 4 मीटरपर्यंत क्षैतिज पृष्ठभागावरून ढकलला जातो. जर तो खोका सुरुवातीला विराम अवस्थेत असेल आणि त्यावर 5 N चे घर्षण बल कार्य करत असेल, तर कार्य-ऊर्जा प्रमेयानुसार खोक्याची अंतिम गतिज ऊर्जा किती असेल?

Ans
- ✗ A. 15 J
- ✓ B. 60 J
- ✗ C. 80 J
- ✗ D. 20 J

Q.51 दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता पर्याय येईल?
28 33 39 46 54 63 ?

Ans
- ✓ A. 73
- ✗ B. 76
- ✗ C. 71
- ✗ D. 75

Q.52 खालील अक्षरमालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या
(डावीकडे) D G J M B W Z L E C I R U H Y L F K V X P W T O Q A (उजवीकडे)

अशी किती व्यंजने आहेत ज्यांच्या प्रत्येकाच्या लगत आधी स्वर आणि लगत नंतरही स्वर येतो?

Ans
- ✓ A. तीन
- ✗ B. एक
- ✗ C. दोन
- ✗ D. तीनपेक्षा जास्त

Q.53 E, X, P, O, R, T आणि S यापैकी प्रत्येकाची परीक्षा सोमवारपासून सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवारी समाप्त होणाऱ्या एकाच आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी आहे. E आणि P यांच्या दरम्यान केवळ तीन जणांची परीक्षा आहे. P ची परीक्षा आठवड्याच्या शेवटच्या दिवशी आहे. T ची परीक्षा R नंतरच्या दुसऱ्या दिवशी आहे. O ची परीक्षा S च्या लगत आदल्या दिवशी आहे. X ची परीक्षा शुक्रवारी नाही. तर X नंतर किती जणांची परीक्षा असेल?

Ans
- ✓ A. सहा
- ✗ B. चार
- ✗ C. दोन
- ✗ D. पाच

Q.54 हा प्रश्न खालील शब्दांवर आधारित आहे.

DUB OWE SKI FIN

प्रत्येक शब्दातील, प्रत्येक स्वराला इंग्रजी वर्णक्रमातील त्याच्या लगत नंतर येणाऱ्या अक्षराने बदलले जाते आणि प्रत्येक व्यंजनाला इंग्रजी वर्णक्रमातील त्याच्या लगत आधी येणाऱ्या अक्षराने बदलले जाते, तर अशा प्रकारे तयार होणाऱ्या किती अक्षर-समूहांमध्ये एकही स्वर येणार नाही?

Ans
- ✓ A. दोन
- ✗ B. एक
- ✗ C. तीन
- ✗ D. चार

Q.55 सहपेशी चाळणनलिकांच्या (sieve tubes) कार्यात कसे योगदान देतात?

Ans
- ✗ A. ते रसवाहिनीला संरचनात्मक आधार देतात.
- ✓ B. ते साखरेच्या भरण्यावर आणि रिकामे करण्यावर देखरेख ठेवतात.
- ✗ C. ते अन्नपदार्थ आणि रेझिन साठवतात.
- ✗ D. ते चाळणनलिकांमध्ये लॅटेक्सच्या साठवणुकीचे नियमन करतात.

adda247

Q.56 खाली दिलेल्या दोन जोड्यांच्या रचनेप्रमाणेच रचना असलेली जोडी निवडा. दोन्ही जोड्यांची रचना समान आहे.

NJG–DZW
DZW–TPM

Ans
✗ A. VRO–KHD
✓ B. VRO–LHE
✗ C. VQM–KGD
✗ D. VQM–LHE

Q.57 36784521 या संख्येतील प्रत्येक अंक डावीकडून उजवीकडे उतरत्या क्रमाने मांडला आहे. अशा प्रकारे तयार होणाऱ्या नवीन संख्येत उजवीकडून पाचवा अंक खालीलपैकी कोणता असेल?

Ans
✓ A. 5
✗ B. 4
✗ C. 6
✗ D. 7

Q.58 पावसाचे पाणी साठवणारी एक टाकी 3.5 m त्रिज्या असलेल्या अर्धगोलाच्या आकाराची आहे. अतिवृष्टीच्या वेळी टाकी पूर्णपणे भरते. या टाकीचे पाणी 0.35 m त्रिज्या आणि 0.7 m उंची असलेल्या वृत्तचिती आकाराच्या बादल्या भरण्यासाठी वापरले, तर त्यात जास्तीत जास्त किती बादल्या पूर्णपणे भरल्या जाऊ शकतात?

Ans
✗ A. 313
✗ B. 373
✗ C. 353
✓ D. 333

Q.59 एका विशिष्ट तर्कानुसार 38 हे 210 शी संबंधित आहे. त्याचप्रकारे, 30 हे 170 शी संबंधित आहे, तर त्या तर्कानुसार खालीलपैकी काय 22 शी संबंधित असेल?
(सूचना : क्रिया संपूर्ण संख्येवर कराव्यात, तिच्यातील अंकांमध्ये त्या संख्येची विभागणी करू नये. उदाहरणार्थ, 13 – येथे 13 वर बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया करणे अभिप्रेत आहे, मात्र 13 ची विभागणी 1 आणि 3 अशी करून 1 आणि 3 यांवर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

Ans
✓ A. 130
✗ B. 126
✗ C. 128
✗ D. 132

Q.60 P, Q, R, S, T, U आणि V या प्रत्येकाची परीक्षा सोमवारपासून सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवार संपणाऱ्या, एकाच आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी आहे. S ची परीक्षा गुरुवारी आहे. U आणि S यांच्या परीक्षांच्या दरम्यान केवळ दोन व्यक्तींच्या परीक्षा आहेत. P ची परीक्षा U च्या लगत नंतरच्या दिवशी आहे. R आणि Q यांच्या परीक्षांच्या दरम्यान केवळ एका व्यक्तीची परीक्षा आहे. V ची परीक्षा S च्या लगत आधीच्या दिवशी आहे. Q ची परीक्षा T च्या लगत नंतरच्या दिवशी आहे. R ची परीक्षा कोणत्या दिवशी आहे?

Ans
✗ A. गुरुवार
✗ B. मंगळवार
✗ C. शनिवार
✓ D. शुक्रवार

Q.61 या प्रश्नात, संख्या/चिन्हांचा समूह खाली दिलेल्या संकेतानुसार आणि पुढील अटींनुसार अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केला आहे. अटींचे पालन करणारे संकेतांचे योग्य संयोजन हे तुमचे उत्तर असेल. कोणत्याही अटीचे पालन न झाल्यास, संबंधित संख्या/चिन्हासाठीचे संकेत सारणीमध्ये दिल्याप्रमाणे थेट वापरावेत.

संख्या/चिन्ह 4 3 + % 8 6 @ ! & $

संकेत Y W H O I J C M N K

अटी–

(i) जर पहिला घटक चिन्ह असेल आणि शेवटचा घटक संख्या असेल, तर पहिल्या आणि शेवटच्या घटकांच्या संकेतांची अदलाबदल करावी.

(ii) जर दुसरा आणि तिसरा घटक विषम संख्या असतील, तर तिसऱ्या घटकाला दुसऱ्या घटकाचा संकेत द्यावा.

(iii) जर चौथा घटक चिन्ह असेल आणि पाचवा घटक संख्या असेल, तर दोन्ही घटकांसाठी © हा संकेत वापरावा.

खालील संख्या आणि चिन्हांच्या गटासाठी कोणता संकेत आहे?

4 3 + % 8

Ans

✔ A. YWH©©

✘ B. YCHOI

✘ C. YWHOI

✘ D. YWHOM

Q.62 **जर '+' व '–' यांची अदलाबदल केली आणि '×' व '÷' यांची देखील अदलाबदल केली, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?**

9 ÷ 5 + 10 × 2 – 3 = ?

Ans

✘ A. 40

✘ B. 50

✔ C. 43

✘ D. 55

Q.63 **सरळरूप द्या $(14pq + 15q)^2 - (14pq - 15q)^2$.**

Ans

✘ A. $840p^2q$

✘ B. $420pq^2$

✘ C. $420p^2q^2$

✔ D. $840pq^2$

Q.64 **हितेशचे वय त्याच्या मुलाच्या वयाच्या तिप्पट आहे आणि त्याची मुलगी मुलापेक्षा 3 वर्षांनी लहान आहे. जर 3 वर्षांपूर्वी या तिघांच्या वयांची बेरीज 83 वर्षे असेल, तर हितेशचे सध्याचे वय (वर्षांत) किती असेल?**

Ans

✘ A. 68

✘ B. 64

✘ C. 67

✔ D. 57

Q.65 **इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चार अक्षर-समूहांपैकी तीन एका विशिष्ट प्रकारे सारखे आहेत आणि त्यामुळे त्यांचा एक गट तयार होतो. कोणता अक्षर-समूह त्या गटात बसत नाही?**

(टीप: गटात न बसणारा अक्षर-समूह हा त्यातील व्यंजने/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील त्यांच्या स्थानावर आधारित नसावा.)

Ans

✘ A. JG-CK

✔ B. RO-KI

✘ C. IF-BJ

✘ D. YV-RZ

blackbook

Q.66 या प्रश्नात, एका प्रश्नानंतर (I) आणि (II) क्रमांकित अशी दोन विधाने दिली आहेत. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधानांत दिलेली माहिती पुरेशी आहे की नाही हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर निवडा.

प्रश्न: A, E, Z, M आणि D या 5 काठ्या प्रत्येकी वेगवेगळ्या उंचीच्या असून, त्यापैकी सर्वात उंच काठी कोणती आहे?
विधाने:
(I) M ही E पेक्षा उंच आहे. E ही D पेक्षा उंच आहे.
(II) D ही A पेक्षा लहान आहे, परंतु Z पेक्षा उंच आहे.

Ans
- ✗ A. केवळ विधान II मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर केवळ विधान I मधील माहिती पुरेशी नाही.
- ✓ B. विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी नाही.
- ✗ C. विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे (आणि केवळ विधान I किंवा केवळ विधान II नाही) प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे.
- ✗ D. केवळ विधान I मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर केवळ विधान II मधील माहिती पुरेशी नाही.

Q.67 एका शाळेने 49 m आणि 196 m या आयताकृती बागेच्या जागी त्याच क्षेत्रफळाच्या चौरसाकृती बागेची योजना आखली आहे. चौरसाकृती बागेच्या बाजूची लांबी (मीटरमध्ये) किती असावी?

Ans
- ✗ A. 122
- ✓ B. 98
- ✗ C. 70
- ✗ D. 147

Q.68 A, B, F, G, H आणि I ही सहा खोकी एकावर एक ठेवली आहेत, पण ती याच क्रमाने असतीलच असे नाही. I आणि B यांच्यामध्ये फक्त दोन खोकी ठेवली आहेत. H च्या वर फक्त G हे खोके ठेवले आहे. B च्या खाली कोणतेही खोके ठेवलेले नाही. F हे खोके A च्या वरच्या बाजूला कुठेतरी ठेवले आहे. A आणि F यांच्यामध्ये किती खोकी ठेवली आहेत?

Ans
- ✗ A. तीन
- ✗ B. एक
- ✓ C. एकही नाही
- ✗ D. दोन

Q.69 एका वर्तुळाच्या जीवा AB आणि CD ह्या वर्तुळाच्या आत एका T या बिंदूत छेदतात. जर AB = 27 cm, AT = 16 cm आणि TC = 20 cm आहे, तर CD (cm मध्ये) ____ च्या इतकी असेल.

Ans
- ✓ A. 28.8
- ✗ B. 35.6
- ✗ C. 31.2
- ✗ D. 22.3

Q.70 POINTED या शब्दातील प्रत्येक अक्षराची इंग्रजी वर्णक्रमानुसार मांडणी केल्यास किती अक्षरांचे स्थान(ने) बदलणार नाही?

Ans
- ✗ A. तीन
- ✗ B. एकही नाही
- ✓ C. दोन
- ✗ D. एक

Q.71 सरळ स्थायी ऊतींचा खालीलपैकी कोणता गुणधर्म जलीय वनस्पतींना तरंगण्यास मदत करतो?

Ans
- ✗ A. लिग्निनयुक्त दृढोतीमुळे मिळणारा कडकपणा
- ✗ B. पेशीचे असमानपणे जाड झालेले कोपरे
- ✓ C. मूलोतिमध्ये वातावकाशाची उपस्थिती
- ✗ D. स्थूलकोन ऊतीमध्ये पेक्टिनमुळे मिळणारी लवचिकता

Q.72 या प्रश्नात, खाली दिलेल्या संकेतांनुसार आणि त्यानंतर दिलेल्या अटींनुसार संख्या/चिन्हांच्या एका गटासाठी अक्षरांचे संकेत वापरले आहेत. अटींचे पालन करणारा संकेतांचा योग्य संच हेच तुमचे उत्तर असेल. जर कोणत्याही अटी लागू होत नसतील, तर तक्त्यात दिल्याप्रमाणे संबंधित संख्या/चिन्हासाठीचे संकेत थेट वापरावेत.

संख्या/चिन्ह 3 @ 8 5 $ # 2 % 7 & 4 9 1 6

संकेत KF UPLDBQRE TAHM

अटी–

(i) जर पहिला घटक चिन्ह असेल आणि शेवटचा घटक संख्या असेल, तर पहिल्या आणि शेवटच्या घटकांच्या संकेतांची परस्पर अदलाबदल करा.

(ii) जर दुसरा आणि तिसरा घटक सम संख्या असेल, तर तिसऱ्या घटकासाठी दुसऱ्या घटकाचा संकेत वापरा.

(iii) जर चौथा घटक चिन्ह असेल, तर चौथा घटक © म्हणून सांकेतिक केला जाईल.

खालील संख्या आणि चिन्हांच्या गटासाठी कोणता संकेत असेल?

9865@

Ans
- ✗ A. AUMPF
- ✗ B. AUMPM
- ✓ C. AUUPF
- ✗ D. AUUPM

Q.73 जर 'A' म्हणजे '÷' असेल , 'B' म्हणजे '×' असेल , 'C' म्हणजे '+' असेल आणि 'D' म्हणजे '–' असेल तर दिलेल्या समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय उत्तर येईल?

40 D 72 C 115 A 23 B 12 = ?

Ans
- ✗ A. 25
- ✗ B. 24
- ✓ C. 28
- ✗ D. 22

Q.74 दिलेली मालिका तार्किकदृष्ट्या पूर्ण होण्यासाठी प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता अक्षर-संख्या समूह येईल?

VAN16 WCP14 XER12 YGT10 ?

Ans
- ✗ A. YIV8
- ✓ B. ZIV8
- ✗ C. ZGV8
- ✗ D. YGV8

Q.75 $\sqrt{48}, 4\sqrt{3}$ आणि $\sqrt{169}$ चे चौथे प्रमाणपद काढा.

Ans
- ✗ A. $\sqrt{13}$
- ✗ B. $\sqrt{12}$
- ✓ C. 13
- ✗ D. 14

"